श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी

संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

आय.क्यु.ए.सी. अंतर्गत स्वामी विवेकानंद यांच्या १६४ व्या जयंती निमित्त

आयोजित

## 'राष्ट्रीय युवा दिन'

**कार्यक्रम अहवाल**

---

आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या दि. ०२ जानेवारी २०२६ च्या परिपत्रकानुसार स्वामी विवेकानंदांच्या १६४ व्या जयंती निमित्त साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनाच्या औचीत्यावर सकाळी ठीक ०८:३० वाजता "रन फॉर स्वदेशी" (स्वदेशी संकल्प रन ) ही दोन किलोमीटरची दौड आयोजित केली यादव मध्ये महाविद्यालयातील बी. एड., बी.पी.एड., एम.एड., एम.पी.एड. विभागातील प्रशिक्षणार्थी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले. या दौडच्या उद्घाटन प्रसंगी दौड चे प्रयोजन युवा दिन कार्यक्रम समन्वयक डॉ. पी. पी. नरळे यांनी प्रस्तावित केले त्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी सर्व सहभागींना स्वदेशी उत्पादनांचा वापर करण्याबाबत प्रोत्साहित केले तसेच आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यासाठी युवकांना आत्मनिर्भर होण्यासाठी संदेश दिला व नियमित स्वत:ला तंदुरुस्त ठेवण्या बाबतचा संदेश देऊन या दौडचे उद्घाटन केले व या दौड मध्ये स्वत:ही सहभागी झाले .

"रन फॉर स्वदेशी स्वदेशी" (स्वदेशी संकल्प रन) सर्व सहभागींनी यशस्वीपणे पूर्ण केली यानंतर सकाळी ठीक १०:०० वाजता युवा दिनाच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून सर्वांसाठी प्रेरक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या व्याख्यानासाठी व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. आर. ए. फुरडे बी. एड. विभाग प्रमुख, कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी हे उपस्थित होते तसेच या व्याख्यानासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. डिसले हे उपस्थित होते तसेच महाविद्यालयातील बी.पी.एड. विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. ए. जी. कांबळे, एम पी एड विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. एम. लांडगे, एम.एड. विभाग प्रमुख डॉ. एल. आय. राठोड हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व विभागाचे प्रशिक्षणार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. आपल्या प्रेरक व्याख्यानामध्ये प्रा. डॉ. आर. ए. फुरडे यांनी स्वामी विवेकानंदांचे विचार अतिशय ठामपणे मांडले. यामध्ये युवा ही राष्ट्राची सर्वात मोठी शक्ती असल्या बाबतचे प्रतिपादन त्यांनी केले व युवकांना आत्मचिंतन व संकल्प करण्याबाबत प्रोत्साहित केले. वर्तमान युगात युवकांसमोरील संधीची विपुलता, विविध आव्हाने, नैतिक मूल्ये याबाबतची परिस्थिती वर्णन केली त्यानंतर भारतीय मूल्ये सत्य, सेवा, सहिष्णुता व करुणा, संस्कृती आणि आधुनिकतेचा समतोल व भारतीयत्वाचा अभिमान बाळगणे हे सशक्त राष्ट्र निर्माण करण्यासाठी गरजेचा असल्या बाबतचे प्रतिपादन केली. स्वदेशी ही केवळ वस्तू नव्हे तर हा विचार आहे. देशी श्रम व देशी प्रतिभेचा सन्मान आहे व आपल्या देशाचा आत्मसन्मान व आत्मनिर्भरतेचा पाया असल्या बाबतचे विचार त्यांनी मांडले स्वामी विवेकानंदांच्या मते दुर्बलता हे पाप आहे आणि म्हणून युवकांनी स्वतःला व्यसनमुक्त ठेवून नियमित योग व्यायाम व क्रीडा सकारात्मक विचारसरणी ठेवून युवकांनी आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यासाठी नवोन्मेष व स्टार्टअप्स सुरू करण्याबाबत प्रोत्साहित केले. तसेच स्वतःची कौशल्य विकसित करून संशोधनावर अधिक भर देऊन स्वतःमध्ये उद्योजकता निर्माण करण्याबाबतचे आवाहन त्यांनी केली. आपल्या अध्यक्षीय समारोप मध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रेरक व्याख्याना दरम्यान मांडलेल्या विचारांना प्रशिक्षणार्थ्यांनी आत्मसात करावे तसेच स्वतः आत्मचिंतन करून त्यावर अंमलबजावणी करावी असे आवाहन केले व सशक्त राष्ट्र निर्मितीसाठी स्वतःचे विचार तसेच स्वतःचे शरीर व स्वतःची मानसिकता सशक्त ठेवण्याबाबतचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक,आभार व सूत्रसंचालन डॉ. पी. पी. नरळे यांनी केले.

College of Education, Barshi Dist. Solapur 413411

I/C. Principal
College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

IQAC organized

National Youth Day program on the occasion of $164^{th}$ Birth Anniversary of Swami Vivekanand

## National Youth Day – Programme Report

On 12 January 2026, Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi run College of Education, Barshi, celebrated National Youth Day on the occasion of the 164th birth anniversary of Swami Vivekananda, in accordance with the circular dated 02 January 2026 issued by Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur.

To mark the significance of National Youth Day, a 2-kilometre "Run for Swadeshi (Swadeshi Sankalp Run)" was organized at 8:30 a.m. Students from B.Ed., B.P.Ed., M.Ed., and M.P.Ed. programmes, along with teaching and non-teaching staff, actively participated in the run.

The objective of the run was explained by the Youth Day Programme Coordinator, Dr. P. P. Narale. The run was inaugurated by the In-charge Principal, Prof. Dr. V. P. Shikhare, who motivated participants to use Swadeshi products, emphasized the vision of Atmanirbhar Bharat (Self-Reliant India), and highlighted the importance of maintaining physical fitness. He also personally participated in the run. All participants successfully completed the run.

At 10:00 a.m., an inspirational lecture was organized. The lecture was delivered by Prof. Dr. R. A. Furade, Head, B.Ed. Department, College of Education, Barshi. The programme was chaired by Prof. Dr. V. P. Shikhare, In-charge Principal.

In his lecture, Prof. Dr. R. A. Furade emphasized that youth are the greatest strength of the nation and encouraged self-introspection, ethical values, innovation, entrepreneurship, and self-reliance. He highlighted Indian values such as truth, service, tolerance, compassion, and pride in Indian culture.

In his concluding address, Prof. Dr. V. P. Shikhare appealed to students to internalize the thoughts shared and strengthen their physical, mental, and moral capacities for nation building.

The programme concluded with anchoring and vote of thanks by Dr. P. P. Narale.

**You Tube Link of Program Celebration:** https://youtu.be/7ybQp0lVA9U

College of Education, Barshi
Dist.Solapur 413411

I/C. Principal
College of Education,Barshi
Dist.Solapur 413411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी
संचालित

## कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

आय.क्यु.ए.सी. अंतर्गत स्वामी विवेकानंद यांच्या १६४ व्या जयंती निमित्त
आयोजित

## 'राष्ट्रीय युवा दिन'

<u>कार्यक्रमाची क्षणचित्रे</u>

---

**रन फॉर स्वदेशी (स्वदेशी संकल्प रन) दौड ची क्षणचित्रे**






College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

रन फॉर स्वदेशी (स्वदेशी संकल्प रन) दौड ल संबोधित करताना प्र. प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे



रन फॉर स्वदेशी (स्वदेशी संकल्प रन) दौड ची क्षणचित्रे





College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

# प्रेरक व्याख्यान कार्यक्रमाची क्षणचित्रे

## मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन




## प्रेरक व्याख्याते प्रा. डॉ. आर. ए. फुरडे यांचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांच्या हस्ते स्वागत




College of Education, Barshi Dist. Solapur 413411

# प्रेरक व्याख्यान कार्यक्रमाची क्षणचित्रे

## प्रेरक व्याख्यान देताना व्याख्याते प्रा. डॉ. आर. ए. फुरडे




## कार्यक्रमाचे आभार व सूत्रसंचालन करताना डॉ. पी. पी. नरळे




College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी

संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

## सूचना

दि.10.1.2026

महाविद्यालयातील बी.एड., बी.पी.एड., एम.एड. व एम.पी.एड. विभागातील सर्व प्रशिक्षणार्थींना सूचित करण्यात येते की, सोमवार दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी स्वामी विवेकानंद यांच्या १६४ व्या जयंती निमित राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून "रन फॉर स्वदेशी (स्वदेशी संकल्प रन)" ही दौड महाविद्यालयातून सकाळी ठीक 8.30 वा.आयोजित केलेली आहे तसेच सकाळी १० वा. प्रेरक भाषण आयोजीत केले आहे. तरी सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे.

College of Education, Barshi Dist.Solapur 413411

Chuhan

प्रभारी प्राचार्य

कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

जि.सोलापूर ४१३४११





श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचालित,

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

स्वामी विवेकानंद यांच्या **१६४** व्या जयंतीनिमित्त

आयोजित **'राष्ट्रीय युवा दिनानिमित्त'**

# "प्रेरक व्याख्यान"

**सोमवार दि. १२ जानेवारी, २०२६**

**स्थळ :- बी.एड. भाग १ चा वर्ग.** **वेळ: १०:०० वा.**

**प्रेरक व्याख्याते : प्रा. डॉ. आर. ए. फुरडे (बी. एड. विभाग प्रमुख)**

**अध्यक्ष : प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे (प्र. प्राचार्य, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी).**

## -: कार्यक्रम पत्रिका :-

| | | |
|---|---|---|
| **प्रतिमापूजन** | : | मान्यवरांच्या हस्ते |
| **प्रास्ताविक** | : | डॉ. पी. पी. नरळे (सहाय्यक प्राध्यापक) |
| **मान्यवरांचे स्वागत** | : | प्राचार्यांच्या हस्ते |
| **प्रेरक व्याख्याते** | : | प्रा. डॉ. आर. ए. फुरडे (बी. एड. विभाग प्रमुख) |
| **अध्यक्षीय समारोप** | : | प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे<br>(प्र. प्राचार्य, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी). |
| **आभार व सूत्रसंचालन** | : | डॉ. पी. पी. नरळे (सहाय्यक प्राध्यापक) |



‘राष्ट्रीय युवा दिन’ २०२६

बातमी

पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी

**संक्षिप्त**



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित दौड.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ जयंती

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे हे होते. व्याख्याते म्हणून डॉ. रविराज फुरडे उपस्थित होते. राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून ‘रन फॉर स्वदेशी’ ही दौड झाली. यामध्ये प्रशिक्षणार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदवला. डॉ. रविराज फुरडे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना आत्मविश्वास व आत्मबळावर भर द्या, चारित्र्यनिर्मिती हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. शिखरे यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्याविषयीचे विचार व्यक्त केले. ते म्हणाले, स्वामी विवेकानंद यांचे विचार आजही युवकांना प्रेरणादायी आहेत. तसेच राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणेतूनच स्वराज्य निर्मितीचे स्वप्न साकार झाले. सूत्रसंचालन डॉ. पी. पी. नरळे यांनी केले.

Solapur Edition
Jan 15, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

College of Education, Barshi • Dist. Solapur 413411

*I/C. Principal*
College of Education, Barshi
Dist. Solapur 413411